पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. क्रीडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक – **१७**

**सभावृत्तांत**

दिनांक - **२०/०५/२०१५** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२०/०५/२०१५** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. ननवरे जितेंद्र बाबा – सभापती**
**२)** मा. तानाजी विठ्ठल खाडे
**३)** मा. लोंढे शुभांगी संतोष
**४)** मा. मोटे किरण बाळासाहेब
**५)** मा. सुपे आशा रविंद्र
**६)** मा. सौ.साळुंके सविता सुरेश
**७)** मा. गिता सुशिल मंचरकर
**८)** मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
**९)** मा. बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.जी.डी.मोरे – मुख्य लिपिक (सभाशाखा), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात नोंदणीकृत सार्व.संस्था/मंडळे यांना अनुदान अदा केलेबाबत अवलोकन व कार्योत्तर मान्यतेबाबत...

विषय क्र.३) आर्थिक सहाय्य अदा करणेबाबत....

विषय क्र.४) महापौर चषक राज्यस्तर रोलबॉल स्पर्धा २०१५ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत....

विषय क्र.५) मा.नगरसदस्य, पिंपरी चिंचवड मनपा व मा.नगरसदस्य, पुणे मनपा यांचा क्रिकेटचा सामना आयोजित करणेस व त्या अनुषंगाने येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत....

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.किरण मोटे अनुमोदक – मा.तानाजी खाडे

दिनांक २०/०५/२०१५ ची मा.क्रिडा समिती सभा दिनांक २१/०५/२०१५ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती –** मा.क्रिडा समिती सभा दिनांक २१/०५/२०१५ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

( **ननवरे जितेंद्र बाबा** )
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक - **१७**

**सभावृत्तांत**

( दिनांक २०/०५/२०१५ ची तहकूब सभा )

दिनांक - **२१/०५/२०१५** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची दिनांक २०/०५/२०१५ ची तहकूब सभा गुरुवार दिनांक **२१/०५/२०१५** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. ननवरे जितेंद्र बाबा - सभापती**
२) मा. तानाजी विठ्ठल खाडे
३) मा. मोटे किरण बाळासाहेब
४) मा. सुपे आशा रविंद्र
५) मा. सौ.साळुंके सविता सुरेश

या शिवाय मा.फुंदे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक ०६/०५/२०१५ व ०७/०५/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१६)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – १०१ विषय क्रमांक - १
दिनांक - २१/०५/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.आशा सुपे अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/२६१/२०१५, दि.०५/०५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरीता १४३ विद्यार्थी खेळाडूंना खालीलप्रमाणे एकूण र.रु.५,१७,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख सतरा हजार फक्त) इतकी शिष्यवृत्ती रक्कम अदा करावी लागणार आहे.

| पात्र / अपात्र | राज्यस्तर | आंतरविद्यापीठ | राष्ट्रीयस्तर | एकूण |
|---|---|---|---|---|
| पात्र | ९० | ९ | ४४ | १४३ |
| अपात्र | ४४ | - | ९ | ५३ |
| एकूण | १३४ | ९ | ५३ | १९६ |

| अ.क्र. | स्पर्धेचा स्तर | प्रत्येकी शिष्यवृत्ती र.रु. | एकूण खेळाडू | एकूण शिष्यवृत्ती र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तर | ३,०००/- | ९० | २,७०,०००/- |
| २ | आंतरविद्यापीठ | ३,०००/- | ९ | २७,०००/- |
| ३ | राष्ट्रीयस्तर | ५,०००/- | ४४ | २,२०,०००/- |
| | | **एकूण -** | **१४३** | **५,१७,०००/-** |

सबब म.न.पा.परिसरातील शालेय १४३ पात्र विद्यार्थी खेळाडूंना सन २०१३-१४ ची क्रीडा शिष्यवृत्ती र.रु.५,१७,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख सतरा हजार फक्त) अदा करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १०२ विषय क्रमांक - २
दिनांक - २१/०५/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.आशा सुपे अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/२२/२०१५, दि.१५/०५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात नोंदणीकृत सार्व.संस्था / मंडळे यांचेकडून प्राप्त झालेल्या अर्जापैकी पात्र झालेल्या संस्थांना १) साई संस्कार संस्था, आकुर्डी, पुणे र.रु.२,९०,०००/- २) चैतन्य महिला मंडळ, भोसरी र.रु.२,९०,०००/- ३) शारदा महिला बालविकास शिक्षण प्रसारक मंडळ, पिंपळे गुरव, पुणे र.रु.१,४७,२२२/- ४) साई मित्रमंडळ, शाहूनगर,चिंचवड र.रु.२,९०,०००/- ५) ममता शिक्षण ट्रस्ट, म्हेत्रेवस्ती, चिखली र.रु.९८,४४३/- व ६) माई बालभवन, मामुर्डी, पुणे र.रु.१,३२,४२६/- या प्रमाणे एकूण र.रु.१२,४८,०९१/- (अक्षरी र.रु.बारा लाख अठ्ठेचाळीस हजार एक्याण्णव फक्त) अनुदान अदा केले असल्याने त्याचे अवलोकन होऊन त्यास कर्योत्तर मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १०३ विषय क्रमांक - ३
दिनांक - २१/०५/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.आशा सुपे
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/८/कावि/३८/२०१५, दि.१९/०५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महापालिकेचे क्रीडा धोरणातील भाग १ ड शिष्यवृत्ती मधील ३ पान क्र.१८ प्रमाणे आंतराष्ट्रीय स्तरांवरील खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे यामध्ये नमुद केलेप्रमाणे कु.वैष्णवी

आनंदराव आंद्रे हिची बँकॉक थायलँड येथे दिनांक १९/०६/२०१५ ते २१/०६/२०१५ रोजी होणा-या इंटरनॅशनल योगासन ५ व्या योगासन स्पोर्टस् चॅम्पियनशिपकरीता योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेच्यावतीने निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित राहणेकामी र.रु.४१,२५०/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस हजार दोनश पन्नास फक्त) कु.वैष्णवी आनंदराव आंद्रे हिस आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १०४ विषय क्रमांक - ४

दिनांक - २१/०५/२०१५ विभाग - क्रीडा

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.आशा सुपे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/३९६/२०१५, दि.१८/०५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने व महाराष्ट्र राज्य रोलबॉल असोशिएशन यांच्या मान्यतेने, पिंपरी चिंचवड शहर रोलबॉल असोशिएशन तसेच प्रबोधनकार विकास क्रीडा संस्था, यमुनानगर यांच्या संयुक्त विद्यमाने माहे मे/जून २०१५ मध्ये प्रबोधनकार ठाकरे मैदानावरील स्केटींग रिंग यमुनानगर, निगडी येथे महापौर चषक राज्यस्तर रोलबॉल स्पर्धा २०१५ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.६,७५,७२८/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता तसेच स्पर्धा अनुषंगाने एकूण खर्च र.रु.६,७५,७२८/- मधील मैदान तयार करणे, स्टेज, मंडप, टेबल, खर्च्या व्यवस्था खर्च, खेळाडू निवास व्यवस्था, गाद्या, उशा, बेडशिटस्, चादर, बादली, मग इ. भाडे खर्च एकूण र.रु.१,४८,०००/- हा स्थापत्य विषयक खर्च स्थापत्य विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व विद्युत स्पिकर व माईक, जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.४०,०००/- हा विद्युत विषयक खर्च, विद्युत विभाग संबंधित क्षेत्रीय कर्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च र.रु.४,८७,७२८/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १०५ विषय क्रमांक - ५

दिनांक - २१/०५/२०१५ विभाग - क्रीडा

सुचक - मा.आशा सुपे अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/३९९/२०१५, दि.१८/०५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.नगरसदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व मा.नगरसदस्य, पुणे महानगरपालिका यांचा क्रिकेट सामना माहे मे/जून २०१५ मध्ये आयोजित करणेस व सदर सामना अनुषंगाने १६ टी शर्ट, पँट, बुट खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेकामी अंदाजे र.रु.६०,०००/- व दोन्ही

संघातील नगरसदस्यांकरिता अल्पोपहार व भोजन व्यवस्था करणेकामी अंदाजे र.रु.४०,०००/- असा अंदाजे एकूण र.रु.१,००,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख फक्त) चे खर्चास मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **ननवरे जितेंद्र बाबा** )
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ४०९ /२०१५
दिनांक : २१/०५/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Krida-14-15\proceeding1_Krida 17.doc